स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत ‘राज्यशास्त्र’ विषयात पीएच.डी.पदवीसाठी सादर करावयाचा शोध

प्रबंधाचा आराखडा

*** संशोधनाचा विषय ***

“ बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 : अंमलबजावणी व परिणामकारकतेचा अभ्यास (विशेष संदर्भ - नांदेड जिल्हा) ”

*** संशोधक विद्यार्थी ***

श्री शिवाजी रामराव कराळे

(एम.ए. डी.एड. बी.एड. सेट)

मल्हार निवास, श्रीनगर मुखेड, जिल्हा नांदेड

*** संशोधक मार्गदर्शक ***

प्रा.डॉ. आर.बी. लक्षटे

सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख,

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग,देगलूर महाविद्यालय, देगलूर जि.नांदेड

मे - 2019

“ बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 : अंमलबजावणी व परिणामकारकतेचा अभ्यास (विशेष संदर्भ - नांदेड जिल्हा) ”

प्रस्तावना (Introduction) :

शिक्षण ही संकल्पना व्यक्ती विकासाचा अविभाज्य घटक आहे.अन्न ,वस्त्र निवारा या सोबतच शिक्षण ही सुद्धा आजच्या काळात महत्वाची गरज आहे.याचे महत्वाचे कारण म्हणजे व्यक्ती विकासामध्ये असणारे शिक्षणाचे महत्वाचे स्थान.लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये शिक्षण हा समाजाचा आत्मा आहे.कारण लोकशाहीच्या मूल्याची रुजवणूक शिक्षणाच्या माध्यमातूनच परिणामकारकरीतीने होत असते.प्राचीन विचारवंत प्लेटो यांनीही आदर्श राजा व राज्य यांच्या निर्मितीसाठी शिक्षणाची उपयुक्तता आपल्या ‘रिपब्लिकन’ या ग्रंथातून स्पष्ट केली आहे.एवढेच नाही तर शिक्षणाचे प्राथमिक व उच्च शिक्षण असे वर्गीकरण करून शिक्षण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया असल्याने राज्याने शिक्षणाकडे लक्ष पुरवण्याची मागणी केली आहे.

डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या मते “लोकशाही निष्ठ शिक्षण म्हणजे लोकांना केवळ साक्षर करणे नव्हे,तर मनाचे औदार्य, प्राण्यांविषयी आदर,एकसंघ राहण्याचे कौशल्य व मानवी हृदयाचे सौंदर्य होय.” महात्मा गांधीजींच्या मते, “बालकांच्या शरीर, मन आणि बुद्धीचा विकास म्हणजे शिक्षण होय.” स्वामी विवेकानंदाच्या मते, “बालकांतील सुप्त शक्ती,गुणांचे प्रकटीकरण म्हणजे शिक्षण.” वरील व्याख्या शिक्षणाचे लोकशाही शासनव्यवस्थेत तसेच व्यक्ती विकासामध्ये किती महत्वाचे स्थान आहे ते विशद करतात.

स्वातंत्र्यपूर्वकाळ व शिक्षण :

ब्रिटीश राजवटीमध्ये भारतात खऱ्या अर्थाने औपचारिक शिक्षणाची सुरुवात झाली. युरोपमध्ये औद्योगिक क्रांतीमुळे निर्माण झालेले नवनवीन व्यवसाय, बाजारपेठा व त्यासाठी आवश्यक असणारे कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्याच्या गरजेतून ब्रिटिशांनी

भारतात शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यास सुरुवात केली. तसेच अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांना अधिष्ठान प्राप्त करून दिले.

जरी ब्रिटीश शासनाने शिक्षणाची सुरुवात व्यावसायिक हेतूने केली असली तरी यामधून शिकलेल्या भारतीय तरुणांनी परदेशी शिक्षण घेऊन भारतीय शिक्षण व्यवस्था व जागतिक शिक्षणांची स्थिती यांचा तुलनात्मक अभ्यास केला. स्वदेशातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी पुढाकार घेतला. परिणामी स्वतंत्र बाण्याचे समाजसुधारक,तत्वज्ञ,क्रांतिकारक व शिक्षणतज्ञ यांची फळीच निर्माण झाली.जे स्वातंत्र्यलढयाबरोबरच समाज व शिक्षण सुधारणेसाठी आग्रही होते. त्यामध्ये महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख प्रामुख्याने करता येईल. समाजाच्या उद्धाराचे साधन म्हणून शासनाने गुणवत्तापूर्ण व मोफत शिक्षणासाठी प्रयत्न करावेत असा आग्रह या समाजसुधारकांनी धरला.

दि.21 सप्टेंबर 1917 रोजी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात ‘मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा’ केला.जो आजच्या शिक्षण हक्क कायद्यामागील मूळ प्रेरणा आहे.

स्वातंत्र्योत्तर काळ व शिक्षण :

भारतीय स्वातंत्र्यानंतर राज्यघटना निर्मितीसाठी स्थापन केलेल्या संविधान सभेने संविधानात व्यक्ति विकास व स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी कलम 14 ते 35 मध्ये मार्गदर्शक तत्वे समाविष्ट केली .यासोबतच कल्याणकारी राज्यानिर्मितीसाठी व देशाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन भविष्यात त्यांची अंमलबजावणी करावी असे सूचित केले.त्यापैकी कलम 45 मध्ये शासनाने देशातील 6 ते 14 या वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था करावी असे सूचित केले.सन 2002 मध्ये 86 वी घटनादुरुस्ती करून देशातील सर्व मुलांना शिक्षण घेण्याचा अधिकार असून त्याचा मुलभूत अधिकारात समावेश

करण्यात आला.त्यासाठी कलम 21(अ) हा भाग समाविष्ट करण्यात आला.याशिवाय राष्ट्रीय शिक्षण आयोग (कोठारी आयोग 1962 - 64),राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 1948,1968,1986 तसेच राष्ट्रीय शिक्षण आराखडा 2005 मधील अनेक मौलिक सूचना व शिफारशी ह्या शिक्षण क्षेत्रातील सुधारणेसाठी महत्वपूर्ण व दिशादर्शक ठरल्या आहेत.

दि.4 ऑगस्ट 2009 रोजी भारतीय संसदेने देशातील 6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम **“Right of Children to Free and Compulsary Education Act 2009.”** संमत केला,ज्याच्या अंमलबजावणीस जम्मू काश्मीर वगळता संपूर्ण देशात दि.1 एप्रिल 2010 पासून सुरुवात झाली.यामुळे आपल्या देशाचा समावेश जगातील निवडक अशा 135 देशामध्ये झाला ज्या देशात शिक्षणाच्या अधिकारास मुलभूत अधिकारात स्थान देण्यात आले आहे.महाराष्ट्र शासनाने दि.11 ऑक्टोबर 2011 रोजी काढलेल्या अधिनियमाने राज्यातही अंमलबजावणीस सुरुवात झाली.

या अधिनियमानुसार राज्यातील शाळांतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व गुणवत्ता विकास करण्यासाठी शाळांमध्ये शिक्षणविषयक पायाभूत सोयी सुविधा निर्माण करणे,राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास अनुरूप अभ्यासक्रमाचे विकसन करणे ही उदिष्टे निश्चित करण्यात आली.

सन 2010 पासून आजपर्यंत गेल्या 9 वर्षात या अधिनियमाची झालेली अंमलबजावणी, परिणामकारकता या बाबत चिकित्सक अभ्यास करणे मला आवश्यक वाटले. म्हणून प्रस्तुत संशोधनात **“ बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम** 2009 ” या अधिनियमाच्या अंमलबजावणी व परिणामकारकतेचा नांदेड जिल्ह्याच्या विशेष संदर्भाने अभ्यास करावा यासाठी मी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

नांदेड जिल्हा शिक्षण विषयक दृष्टीक्षेप :

महाराष्ट्राच्या इतिहासात नांदेड हा प्राचीन परंपरा,इतिहास लाभलेला व मानाचे स्थान

लाभलेला जिल्हा आहे.पूर्वी नावदंडी,नंदितट ,नंदीग्राम,नंद्याल अश्या अनेक नावाने नांदेडला ओळखले जात असे.शालिवाहन,बहामनी,निजामशाही,मराठेशाही,भारतीय स्वातंत्र्य व हैद्राबाद मुक्तीसंग्राम यामध्ये येथील भूमिपुत्रांनी दिलेले योगदान व शोर्य अतुलनीय आहे.शीख धर्माचे पवित्र स्थान,संस्कृत विद्येचे पीठ व पंडितांचे स्थान,अनेक प्रतिभावान लेखक कवींची मातृभूमी आहे.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या रूपाने मराठवाड्यातील उच्चशिक्षणाचे केंद्र म्हणूनही नांदेड जिल्हा ओळखला जात आहे.

नांदेड जिल्ह्यात एकूण 16 तालुके असून क्षेत्रफळ एकूण 10528 चौ.कि.मी.आहे.सन 2011 च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 33,61,292 एवढी असून 11 शहरे व 1603 गावांचा त्यात समावेश होतो.राज्याच्या एकूण क्षेत्रफळामध्ये 3.42 % वाटा जिल्ह्याच्या क्षेत्रफळाचा आहे.स्त्री साक्षरता दर 66.68,%पुरुष साक्षरता दर 86.62%व एकूण साक्षरता दर 75.45% एवढा आहे.शेती हा जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे.नांदेड जिल्ह्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची संख्या 1896 असून जिल्हा परिषद माध्यमिक शाळा 70,उच्च शिक्षण संस्था 172 अश्या एकूण 2598 शाळा आहेत.जिल्ह्यातील 27.2 %लोकसंख्या शहरात तर 72.8 % लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे.

शिक्षण क्षेत्राचा विचार करता अजूनही जिल्ह्यातील शैक्षणिक विकास होण्यासाठी भरपूर संधी व क्षेत्र उपलब्ध आहेत. तसेच पुरेश्या पायाभूत सेवा सुविधांची निर्मिती करणे आवश्यक आहे. शहरी व ग्रामीण भागात शैक्षणिक गुणवत्तेमध्ये फरक आहे.ते समजून घेता यावे म्हणून सन मी 2009 मध्ये संमत झालेल्या “ **बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 : अंमलबजावणी व परिणामकारकतेचा अभ्यास (विशेष संदर्भ - नांदेड जिल्हा)** ” या विषयात मी संशोधन करत आहे.

संशोधनाचे महत्व (Importance of Research) :

या संशोधनातून बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यातील समाविष्ट विविध पैलूंचा अभ्यास करण्यास मदत होईल .शिक्षण हक्क कायद्यानुसार प्राथमिक शाळा व विद्यार्थी यांच्यातील गुणवत्तेत झालेला बदल व त्याचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी आवश्यक सविस्तर आकडेवारी, उपलब्ध होईल.जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षण क्षेत्रात झालेले बदल, अडचणी, प्राथमिक शिक्षणावर प्रभाव टाकणारे घटक कोणते या प्रश्नाची उत्तरे मिळण्यासाठी हे संशोधन उपयुक्त आहे.

जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व त्यांचे शिक्षणविषयक कार्ये यांच्यातील परस्पर संबंध जाणून घेण्यासाठी हे संशोधन महत्वाचे आहे. शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करताना त्यात येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन उपाययोजना या संशोधनाच्या माध्यमातून करणे शक्य होईल. शिक्षण प्रक्रियेतील विद्यार्थी, पालक, शिक्षक, शासन, प्रशासन व राजकीय नेते या घटकांशी संबंधीत असलेल्या अडचणीचा विचार या संशोधनात करण्यात आल्याने ते अधिक व्यावहारिक होईल. ज्याचा उपयोग भविष्यातील शैक्षणिक समस्या सोडवण्यासाठी निश्चितपणे होणार आहे.

विषय निवडीची कारणे (Resons for Selection of Topic) :

आज जागतिकीकरणाच्या काळात संशोधनासाठी अनेक विषय उपलब्ध आहेत. संशोधन हे स्वत:च्या आवडीच्या व रुची असलेल्या विषयात करण्यात आले तर ते अधिक उपयुक्त, प्रामाणिकपणे, वस्तुनिष्ठपणे होण्यास मदत होते. पूर्वगृहदुषित भावनाप्रधान व आवड नसलेल्या विषयात केलेले असल्यास ते संशोधानाच्या कसोटीवर अपेक्षेप्रमाणे खरे उतरणे अवघड असते.

व्यक्तीविकासात शिक्षण या विषयास अतिशय महत्वाचे स्थान आहे. शिक्षणाने रोजगार, व्यवसाय व स्वावलंबन या गरजा पूर्ण कराव्यात अशी अपेक्षा करण्यात येते. याची

सुरुवात खऱ्या अर्थाने प्राथमिक शिक्षणापासून होते. प्राथमिक शिक्षण हे उच्च शिक्षणाचे अधिष्ठान आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण या विषयाचे असणारे स्थान लक्षात घेऊन त्याकडेही तेवढेच लक्ष पुरवण्यासाठी या अधिनियमानुसार 'अतिथी निदेशकांच्या' नेमणुका करण्यात आल्या आहेत.याचा अभ्यासही या संशोधनातून करणे मला आवश्यक वाटत होते.म्हणून या विषयाची निवड मी निवड केली आहे.

संशोधक हा स्वतः प्राथमिक शिक्षक असून गेली 18 वर्षे प्राथमिक शिक्षक म्हणून या क्षेत्रात कार्यरत आहेत. प्राथमिक शिक्षण क्षेत्रात काम करत असताना या क्षेत्रातील अनेक शैक्षणिक प्रकल्प, शासकीय ध्येयधोरणानुसार होत असलेल्या सुधारणांशी संबंध आलेला आहे. अध्ययन-अध्यापन करत असताना येणाऱ्या अडचणी व त्या सोडवण्यासाठी तसेच त्यावर उपाययोजना करण्यासाठी स्वतःच्या कार्याशी संबंधित संशोधन विषयाची निवड केली आहे. 6 ते 14 वयोगटातील बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाची फार मोठी जबाबदारी 1 एप्रिल 2010 पासून अंमलात आलेल्या शिक्षण हक्क कायद्यानुसार शासनव्यवस्थेवर आली आहे.

प्रस्तुत कायद्यानुसार विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासन यांच्याशी संबंधित सुधारणा करून इयत्ता 1 ते 8 वीच्या म्हणजेच प्राथमिक शिक्षण क्षेत्रात गुणात्मक बदल करण्यात येत आहेत. या सर्व बाबी लक्षात घेऊन या अधिनियमाच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे मला महत्वाचे वाटत होते.म्हणून या अधिनियमास अनुसरून नांदेड जिल्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये होत असलेल्या बदलाचा अभ्यास या संशोधनातून करण्यासाठी, त्यातील अनेक पैलूचा, आढळून आलेल्या त्रुटींचा अभ्यास करून आवश्यकतेनुसार उपाययोजना व शिफारशी करण्याच्या दृष्टीने मी या विषयाची निवड केली आहे.

संशोधनाची उदिष्टे (Objectives of Research) :

प्रस्तुत संशोधनाची उदिष्टे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

1) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, 2009 चा अभ्यास करणे.
2) स्थानिक नागरिक, पालक, शाळा व्यवस्थापन समिती, स्थानिक राजकीय नेते, स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी यांच्यातील या अधिनियमाविषयीचे ज्ञान जाणून घेणे व त्याची जाणीव निर्माण करून देणे.
3) या अधिनियमानुसार नांदेड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये झालेल्या शैक्षणिक व अन्य बदलाचा आढावा घेणे.
4) नांदेड जिल्यातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती व समस्यांचा अभ्यास करणे.
5) मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या अंमलबजावणीतील अडथळयांचा शोध घेणे.
6) प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणास प्रभावित करणाऱ्या समाज, शासन व प्रशासन स्तरावरील यंत्रणाचा घटकांचा अभ्यास करणे.
7) या अधिनियमाने प्रभावित असणाऱ्या सर्व घटकांच्या अडचणींचा शोध घेणे .
8) प्राथमिक शिक्षणातील गुणवत्ता सुधारण्यासाठी शिफारशी करणे.

संशोधनाची गृहितके (Hypothesis of Research) :

“ **बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम** 2009 : **अंमलबजावणी व परिणामकारकतेचा अभ्यास (विशेष संदर्भ - नांदेड जिल्हा)** ” या संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेली गृहीतके खालीलप्रमाणे आहेत.

1) हा अधिनियम 6 ते 14 वयोगटातील बालकांच्या प्राथमिक शिक्षणाशी संबंधित आहे.
2) हा अधिनियम इयत्ता पहिली ते आठवीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांशी संबंधित आहे.
3) या अधिनियमाने प्राथमिक शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत शैक्षणिक सोयीसुविधा निर्माण

केल्या आहेत.

4) या अधिनियमाने लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांना प्राथमिक शिक्षणाविषयी जागरूक करून सक्रीय केले आहे.

5) बालकांना सहजपणे व सर्व समावेशक प्राथमिक शिक्षण उपलब्ध झाले.

6) या अधिनियमाने प्राथमिक शिक्षणातील गुणवत्तावाढ व मूल्यमापन प्रक्रियेत सुधारणा झाली आहे.

7) शाळाबाह्य,अपंग तसेच शिक्षणापासून वंचित मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सहभागी केले आहे.

8) या अधिनियमाने विद्यार्थ्यात शिक्षणाची आवड निर्माण केली आहे.

पूर्व संशोधनाचा आढावा (Review of Literature) :

प्रस्तुत अधिनियम दि.4 ऑगस्ट 2009 रोजी संमत झाल्यानंतर प्रत्यक्ष अंमलबजावणी दि.1 एप्रिल 2010 पासून जम्मू काश्मीर वगळता संपूर्ण देशात सुरु झाली. या बाबीला आता 9 ते 10 वर्षे होत आहेत. या विषयाच्या अनुषंगाने यापूर्वी करण्यात आलेले संशोधन व साहित्याचा शोध घेतला असता या विषयावर फार कमी संशोधन झालेले आहे.सुरुवातीच्या कालावधीमध्ये या विषयावर संशोधन करून या अधिनियमाची अंमलबजावणी व परिणामकारकता अभ्यासणे, निष्कर्ष काढणे एवढ्या कमी कालावधीत घाईचे झाले असते. परंतु या अधिनियमाच्या अंमलबजावणीस आता 10 वर्षे पूर्ण होत आहेत त्यामुळे या विषयावर वस्तुनिष्ठ संशोधन करण्यासाठी, संदर्भ सामग्रीच्या उपलब्धतेच्या दृष्टीने हा कालखंड दीर्घकालीन नसला तरी संशोधन कार्य हाती घेण्यासाठी पुरेसा नक्कीच आहे. प्रस्तुत विषयाशी संबंधित पूर्व संशोधनाचा आढावा घेऊन त्यातील घटक समजून घेऊन हे संशोधन कार्य पूर्ण करण्यात येईल.

संशोधन पद्धती (Research Methods) :

प्रस्तुत विषयावर संशोधन करण्यासाठी विषयाच्या अनुषंगाने विविध संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.ज्यामध्ये ऐतिहासिक, ग्रंथालयीन, अनुभवात्मक,विश्लेषणात्मक व चिकित्सक अभ्यास पद्धतीचा वापर करण्यात येईल.

संदर्भग्रंथ हा संशोधनाचा महत्वाचा आधार आहे. संदर्भ पडताळणीसाठी ग्रंथालये अतिशय उपयुक्त आहेत.जुने संदर्भ, शिफारशी पडताळून पाहून त्याचा तुलनात्मक अभ्यास करणे ग्रंथालयातील अनेकविध संदर्भाग्रंथामुळे शक्य होते.याशिवाय विविध शोधनिबंधाचे, विषयाशी संबंधित विविध संकेतस्थळे यांचे अवलोकन करण्यात येईल.

तथ्य संकलन (Data Collection) :

या संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी पुढील साधन वापर करण्यात येईल.

1) **प्राथमिक साधने (Primary Source) :** प्रस्तुत संशोधन कार्यात तथ्य संकलनासाठी प्राथमिक साधन-स्त्रोत म्हणून मूळ अधिनियम, क्षेत्राशी संबधित तज्ञ व्यक्तीच्या मुलाखती, प्रश्नावल्या व अनुसूची यांचा आवश्यक तेथे वापर करण्यात येईल.
2) **दुय्यम साधने (Secondary Source) :** दुय्यम साधने-स्त्रोतांतर्गत शिक्षण हक्क अधिनियमाच्या अनुषंगाने प्रकाशित संदर्भग्रंथ,शासकीय व निमशासकीय प्रकाशने ,अहवाल, शासननिर्णय, राजपत्र, भारताची जनगणना अहवाल, विविध विद्यापीठातील शोधनिबंध, वर्तमानपत्रे, मासिके, वार्षिकांक, विषयाशी संबधित प्रकाशित-अप्रकाशित माहिती इत्यादीच्या आधारे संशोधनासाठी माहिती व तथ्यांचे संकलन करण्यात येईल.

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. नांदेड जिल्ह्यातील समाविष्ट 16 तालुक्यांपैकी प्रत्येक तालुक्यातून 5 याप्रमाणे ग्रामीण व शहरी भागातील मराठी व

उर्दू माध्यमांच्या अशा एकूण 80 शाळांतून नमुना निवड यादृच्छिक (Random) पद्धतीने करण्यात येईल.

अ.क्र.	तालुक्याचे नाव	नमूना संख्या	अ.क्र.	तालुक्याचे नाव	नमूना संख्या
1	मुखेड	5	9	अर्धापूर	5
2	कंधार	5	10	उमरी	5
3	लोहा	5	11	भोकर	5
4	देगलूर	5	12	हदगाव	5
5	नायगाव	5	13	हिमायतनगर	5
6	बिलोली	5	14	मुदखेड	5
7	धर्माबाद	5	15	माहूर	5
8	नांदेड	5	16	किनवट	5
					एकूण 80

निवड करण्यात आलेल्या शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी प्रश्नावलीच्या साह्याने मुलाखती घेऊन संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक बाबीचे सर्वेक्षण करून साधन सामुग्रीचे संकलन करण्यात येईल.

ज्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ञ, स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद शिक्षण सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, शिक्षणाधिकारी(प्रा.), मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्यातील राष्ट्रपती/राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक यांच्या मुलाखती घेतल्या जातील. विषयाच्या अनुषंगाने प्राप्त माहितीचा उपयोग या संशोधन कार्यासाठी करण्यात येईल.

संशोधनाच्या मर्यादा (Limitations of Research) :

या संशोधनाच्या मर्यादा पुढीलप्रमाणे आहेत.

1) प्रस्तुत संशोधन हे **"बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009"** या विषय अभ्यासापुरतेच मर्यादित आहे.
2) प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्यातील 16 तालुक्यातील समाविष्ट जिल्हा परिषदेच्या शाळांशी निगडीत आहे.
3) या संशोधनात जिल्हा परिषद शाळांतील 6 ते 14 वयोगटातील इयत्ता 1 ते 8 वी पर्यंतच्याच विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात येईल.
4) प्रस्तुत संशोधनात विद्यार्थी, शिक्षक, पालक, लोकप्रतिनिधी, प्रशासन व समाज या घटकांचाच विचार करण्यात येईल.

संशोधन आराखडा (Research Design):

प्रस्तुत संशोधन विषयाची प्रकरण निहाय मांडणी खालीलप्रमाणे करण्यात येईल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

विषय प्रवेश, संशोधन समस्या, संशोधन विषयाचे महत्व, विषय निवडीची कारणे, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधन पद्धती - तंत्रे,तथ्य संकलनाची साधने

प्रकरण दुसरे : शिक्षण

शिक्षण संकल्पना अर्थ, भारतीय शिक्षण व्यवस्थेतील प्राथमिक शिक्षणाचा मागोवा, भारतीय संविधानातील शिक्षणविषयक तरतुदी इ.चा आढावा घेतला जाईल.

प्रकरण तिसरे : बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009

शिक्षण हक्क अधिनियम उद्दिष्ट्ये,स्वरूप, प्रमुख तरतुदी, शाळातील उपलब्ध पायाभूत सुविधा,गुणवत्ता विषयक तरतुदी,मूल्यमापन प्रक्रिया,शिक्षक प्रशिक्षण,पालक व स्थानिक प्राधिकरणांचा सहभाग, समावेशित शिक्षण विषयक घटक, शिक्षणाच्या समृद्धीकरणासाठीच्या योजना या मुद्यांच्या आधारे संकलित माहितीचे विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण चौथे : नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाचा आढावा

या प्रकरणात नांदेड जिल्यातील प्राथमिक शिक्षण विषयक आढावा घेऊन विश्लेषण करण्यात येईल.

प्रकरण पाचवे : बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 व नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षणाची स्थिती

अधिनियमाची परिणामकारकता ,अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी ,लोकप्रतिनिधींची मते, प्रत्यक्षातील झालेला फायदा ,शिक्षकांची भूमिका इत्यादीचे विश्लेषण केला जाईल.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

संशोधन कालावधी दरम्यान उपलब्ध शोध सामग्रीनुसार उपरोक्त संशोधन आराखड्यात बद्दल होऊ शकतो.

परिशिष्टे : स्थानदर्शक नकाशा,छायाचित्रे इत्यादी.

संदर्भग्रंथ सूची :

1) सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे – डॉ.प्रदीप आगलावे,साईनाथ प्रकाशन नागपूर.
2) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियक 2009 :भारताचे राजपत्र.
3) महाराष्ट्र शासन राजपत्र क्र.149 दि.11 ऑक्टोबर 2011.
4) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग - विविध शासन निर्णय.
5) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियक 2009 : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था नांदेड.
6) शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रशिक्षण : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन,मुंबई – 32.
7) प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र – जीवन शिक्षण विशेषांक जुलै 2016.
8) शाळा आहे शिक्षण नाही – हेरंब कुलकर्णी,ग्रंथाली अर्पणपत्र.
9) विविध स्तरावरील शिक्षण व शिक्षणाचे कार्य : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.
10) www.mscepune.in
11) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम (1 ते 5,6 ते 8) : महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे.
12) भारतातील प्राथमिक शिक्षण : जे.पी.नाईक.

* * *

*** संशोधक विद्यार्थी ***

शिवाजी रामराव कराळे

एम.ए. बी.एड. सेट (राज्यशास्त्र)

*** संशोधक मार्गदर्शक ***

प्रा.डॉ. आर.बी. लक्षटे

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख,

देगलूर महाविद्यालय,देगलूर जि.नांदेड